पीएच.डी.संशोधन आराखडा

“मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास”

(विशेष संदर्भ - इ.स.2000 ते इ.स.2020)

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.(विद्यावाचस्पती) या पदवीकरिता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

यांस शोध प्रबंधाचा आराखडा सादर

संशोधक

श्री.भारत अच्युतराव गर्जे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.दीपक रामभाऊ चिद्दरवार

मराठी विभागप्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर

जि.लातूर (महाराष्ट्र)

संशोधन केंद्र

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर. जि.लातूर

जुलै – 2023

प्रस्तावना –

मराठवाडा हा प्रांत कायमच अस्मानी व सुलतानी संकटांनी ग्रस्त असलेला प्रांत होय.इथे वास्तव्यास असलेल्यांना नैसर्गिक संकटांची झळ बसली नाही,असे कधी घडले नाही.कधी दुष्काळ ,कधी भूकंप तर कधी अनावर्षण कायमच एक झाले की दुसरे संकट दत्त म्हणून या प्रांतातील लोकांच्या नशिबी उभे असलेले दिसते.औरंगाबाद,जालना,परभणी,हिंगोली,नांदेड,लातूर,बीड व उस्मानाबाद या आठही जिल्हयांचा विचार केला तर या प्रांतातील औद्योगिक विकास जेमतेमच,साखर कारखानदारी सोडली तर दुसरी व्यवस्था इथे उभी राहिली नाही.सिंचनाची व्यवस्थाही परिपूर्ण नाही म्हणून बागायती पेरा नाममात्रच.शिक्षणाच्या सोयीही अपुऱ्याच पुणे-मुंबई शिवाय हाती काहीच लागत नाही.लोकसेवा आयोग असो की कोणतीही स्पर्धा परीक्षा,तयारी करायची म्हटली की या महानगरात गेल्याशिवाय पर्याय नाही.सगळया अपुऱ्या सोयी आणि नशिबाला बोल लावीत जगण्याशिवाय इथल्या माणसांना दुसरा पर्याय नाही.मोठया संख्येने असलेला शेतमजूर,शेतकरी एकतर शासनाच्या मेहरबानीवर जगतो,नाहीतर परमेश्वराच्या कृपेने तगतो.नाहीतर त्याच्या वाटयाला दुर्भिक्ष्य आले म्हणूनच समजा.1990 च्या सुमारास आपला देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी झाला.जागतिकीकरण,उदारीकरण आणि खाजगीकरण याचाही यथावकाश स्वीकार केला गेला.त्यामुळे अर्थव्यवस्थेचे रूप पालटले.बाजारकेंद्री अर्थव्यवस्था उदयाला आली.मूल्यव्यवस्था गुंडाळली गेली.नातीगोती संबंध आणि एकमेकांशी असलेल्या जिव्हाळयाला सुरूंग लागला.'वापरा आणि फेकून द्या ' हे नवे तंत्र लोकजीवनात रूजू लागले.लोकशाही या कल्याणकारी व्यवस्थेतील मागास शोषित असणाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांना वंचित व्हावे लागले.सर्वांत शेवटचा घटक म्हणजे शेती.शेतकऱ्यांची नेहमीच दुरावस्था ठरलेली आहे.दुःख त्याच्या पाचवीला पुजलेले आहे,असा शेतकरी साहित्यिकांच्या चिंतनाचा विषय झाला. त्याच्या दुरावस्थेचे चित्रण कादंबरीत कसे केल्या गेले?या अनुषंगाने मराठवाड्यातील कादंबरीकारांनी शेतकऱ्यांच्या

दुरावस्थेचे केलेल्या चित्रणाचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत विषयानुषंगाने अभ्यासावयाचा आहे.

विषय निवडीची भूमिका-

जागतिकीकरणात देशाच्या नियोजनात शेतीचा क्रम शेवटी लागला.संख्येने बहुसंख्य असणाऱ्या शेतकऱ्यांच्या नशिबी दु:ख,दैन्य,दारिद्र्य आणि वेदनाच आल्या.शेतकरी अडचणीत आला.नवे तंत्रज्ञान आले.बी-बियाणे,खते आली.ट्रॅक्टर आणि नवनव्या यांत्रिक गोष्टी आल्या.शेतकरी परावलंबी होऊ लागला.शेती दिवसेंदिवस आतबटयांची ठरू लागली.शेतीसाठी खर्च केलेले पैसेही वसूल होत नसल्याने शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होऊ लागला.1990 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालू झाल्या.जगातल्या मृत्युच्या दहा सर्वोच्च कारणांमध्ये आत्महत्येचा समावेश होतो.हत्येपेक्षा आत्महत्या अधिक प्रमाणांत होतात."दरवर्षी जगभरात सुमारे आठ लाख घटना घडतात.त्यातील 17% म्हणजे 1,35,000/- आत्महत्या एकटया भारतात घडून येतात.येथे दर तासाला एक विद्यार्थी आत्महत्या करतो,दर अडीच तासाला एक शेतकरी."[1] "एका अहवालानुसार 1990 पासून आजतागायत सुमारे 3 लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत."[2] शेतकऱ्यांच्या आत्महत्येची,विवंचनेची,वेदनांची अनेक कारणे आहेत.उत्पादन आधारीत भाव नाही,हमी भाव नाही,खते- बी बियाणे यांचे सातत्याने भाव वाढणे,शेतात कामाला माणूस न मिळणे,शासनांच्या अनेक कार्यक्षम योजना,शेतमालाला भाव न मिळणे,उत्पन्न आणि खर्च याचा मेळ न लागणे,मुलींचे लग्न,मुलांचे शिक्षण रोजगार निर्मितीसाठी सेझची निर्मिती,महामार्ग उद्योग क्षेत्र यांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेणे.विविध प्रकल्प केंद्र व राज्य सरकारला महत्वकांक्षी वाटू लागले आहेत.त्यासाठी परकीय उत्पादन कंपन्यांशी करार करणे,यातून शेतकऱ्यांना आपल्या जमिनीला मुकावे लागणे या आणि अशा भयंकर कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करतात.1990 नंतरच्या साहित्यातही याचे चित्रण उमटू लागले.कथा कादंबऱ्यातून

नागवल्या गेलेल्या शेतकऱ्यांचे चित्रण येऊ लागले. माझा जन्मच शेतकरी कुटूंबात झाला असल्यामुळे हे सारे प्रश्न मला माझेच वाटू लागले,म्हणून मला सन 2000 ते 2020 या कालखंडातील शेतकरी प्रश्नांच्या दुरावस्थेवर आधारीत कादंबरीचा सर्वांगीण अभ्यास होणे, गरजेचे वाटले.त्या अनुषंगाने प्रस्तुत शोध प्रबंधात 'मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा अभ्यास' (इ.स.2000 ते इ.स.2020) व्हावा,ही विषय निवडी मागील भूमिका आहे.

उद्दिष्टे –

'मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा अभ्यास'
(इ.स.2000 ते इ.स.2020)

1. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीतील शेतकरी व भूमीनिष्ठ चित्रणाचे वास्तव स्वरूप समजून घेणे.
2. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्यां कादंबरीतून मानवी वृत्ती व प्रवृत्ती यांच्या चित्रणांचा अभ्यास करणे.
3. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्यांच्या शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे चित्रण कादंबरीत कितपत आले आहे,याचा अभ्यास करणे.
4. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्यांच्या कादंबरीत बदलत्या ग्रामीण वास्तवांचे चित्रण कसे केले आहे,याचा अभ्यास करणे.
5. जागतिकीकरण,उदारीकरण,खाजगीकरण व यंत्रयुग यांचा ग्रामीण जीवनावर प्रभाव वाढत असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्यांच्या कादंबरीचे बदलते स्वरूप याचा अभ्यास करणे.
6. वास्तवातील शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्यांच्या कादंबरीतील भूमीकेंद्रीतता याचा अभ्यास करणे.

विषयाचे महत्व आणि आवश्यकता –

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीत शेतकरी जीवनाची भाषा,संस्कृती,परंपरा आणि बदल या जीवनातील संदर्भात अतिशय वास्तवपूर्ण चित्रण करण्यात लेखकांना पूर्णतः यश आले असून या यशातच मराठी शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची चित्रण करणाऱ्या कादंबरी वाङमयाचे मोठेपण सामावले आहे.या कादंबरीतून मराठवाड्यातील कादंबरीकारांनी आपल्या परिसरातील शेतकऱ्यांच्या वेदना,वंचनांची नोंद घेतली.किंबहुना वेदनांच्या थारोळ्यात लिप्त झालेल्या शेतकऱ्यांचे दुःख या साहित्यिकांच्या चिंतनाचा विषय झाला.या कादंबऱ्यांचा सखोल अभ्यास करून त्यातील जीवन जाणिवांचा शोध घेण्याचा माझा मनोदय आहे.

संशोधन पध्दती व संशोधन साधने –

संशोधन विषयासंबंधी विवेचक पद्धतीने अभ्यास,त्यांच्या समर्थनार्थ विचारांची मांडणी करून करण्यात आला आहे प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक व मूल्यमापन पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

1)प्राथमिक साधने–

मराठवाडी साहित्यिकांच्या कादंबऱ्या,कादंबरी समीक्षा,आत्महत्याग्रस्त कुटुंबाची मुलाखत,शासनाच्या विविध योजना व त्यांची उपयोगिता,शासनाचे कृषी धोरण,शेतकरी संघटना व त्यांचे नेते,सामाजिक कार्यकर्ते त्यांच्या मुलाखती इत्यादी.

2) दुय्यम साधने –

छायाचित्रे,वर्तमानपत्रातील,कात्रणे,मासिके,वार्षिक अंक,विविध दिवाळी अंक, इंटरनेटवरील वेबसाइट्स,रेकॉर्डिंग,कॅमेरा यासह उपलब्ध दुय्यम साधनांचाही संशोधन कार्यासाठी उपयोग करण्यात येईल.

विषयाची व्याप्ती –

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीच्या उगमापासून 2000 पर्यंतचा आढावा घेऊन सन 2000 ते 2020 या काळातील निवडक १५ शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीचा अभ्यास केला आहे. सन 2000 ते 2020 याच काळातील निवडक 10 शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची चित्रण करणाऱ्यांचा कादंबरीचा अभ्यास ही या विषयाची मर्यादा आहे.

गृहितके –

1) मराठवाड्यातील ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण रेखाटलेले आहे.
2) मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरी मध्ये भाषिक वैविध्यता आहे.
3) मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरी मध्ये शेतकऱ्यांच्या दाहक अनुभवाचे वास्तव चित्रण व शासनाचे धोरण आहे.
4) मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या दुरावस्थेस जागतिकीकरण कारणीभूत आहे.
5) यांत्रिकीकरणाचा शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जीवनावर परिणाम झालेला आहे.
6) बदलत्या जीवनशैलीचा शेतकऱ्यांच्या जीवनावरील परिणाम गंभीर आहे.

प्रकरण पहिले

कादंबरीची संकल्पना

प्रस्तुत प्रकरणात कादंबरीची संकल्पना,शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची चित्रण करणारी कादंबरी म्हणजे काय?

१)कादंबरीची संकल्पना

२)कादंबरीचे घटक

३)कादंबरीचे स्वरूप

४)ग्रामीण कादंबरी

५)कृषीकेंद्रित कादंबरी

६)प्रादेशिक कादंबरी

७)मराठवाडी कादंबरी

८)मराठवाडी कादंबरीची वैशिष्ट्ये

९) समारोप

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरी,साठोत्तरी शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीची संकल्पना याचा विचार केलेला आहे.

प्रकरण दुसरे

मराठवाडी ग्रामीण कादंबरी

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या सन 2000 ते 2020 या काळातील निवडक कादंबऱ्यांच्या आधारे शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीचे कथानक,निवेदन पद्धती,वातावरण निर्मिती,व्यक्ती रेखाटन,म्हणी व वाक्प्रचार,प्रतिमा आणि प्रतीके,भाषाशैली,संवाद कौशल्य समजावून घेतले आहे.निष्कर्षाची मांडणी करून समारोप केला आहे.

प्रकरण तिसरे

भूमीनिष्ठ जाणीवांचे मराठवाडी कादंबरीतून येणारे चित्रण

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या निवडक शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीमधील (१)जीवन जाणिवा, (२) शेती आणि शेतकरी जीवनाचा संबंध, (३) जमिनीच्या प्रकारांचा शेतकरी जीवनावर पडलेला प्रभाव (कोरडवाहू,जिरायती,बागायती), (४) शेती आणि ग्रामीण संस्कृतीचा संबंध, शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची चित्रणे, (५) निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीवर होणारा परिणाम व त्याचा शेतकऱ्यांच्या जगण्याशी संबंध, (६)पारंपारिक उत्पादन घेण्याच्या मानसिकतेवर बदलत्या यंत्रयुगाचा पडलेला प्रभाव, (७)शेतकरी आणि शेतमजूर यांची सावकाराकडून आणि शासनाकडून होणारी पिळवणूक (८) शेतकरी संघटना व कृषी जीवन यांचा संबंध इत्यादी घटकांच्या आधारे समजून घेऊन काही ठळक निष्कर्ष यांची मांडणी केली आहे.

प्रकरण चौथे

कादंबरीतील शेतकऱ्यांच्या वेदनांचे स्वरूप (चित्रण)

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या निवडक कादंबऱ्यांच्या आधारे शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्रण करणाऱ्या कादंबरीतून आविष्कृत झालेल्या चित्रणांचा अभ्यास हा शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची चित्रण करणाऱ्या कादंबरीतून आविष्कृत झालेला धार्मिक,सामाजिक,राजकीय,विज्ञानवादी,परिवर्तनवादी,कौटुंबिक आणि कृषी विषयक दृष्टिकोन लक्षात घेऊन निष्कर्षांची मांडणी करून समारोप केला आहे.

प्रकरण पाचवे

मराठवाडी ग्रामीण कादंबरीची वैशिष्ट्ये

१) कलात्मकता म्हणजे काय?

२) मराठवाडी कादंबरीतून व्यक्त झालेल्या कलात्मकतेचे स्वरूप

३) मराठवाडी कलात्मक कादंबऱ्या

४) भाषिक वैशिष्ट्ये

संदर्भ सूची –

अ.क्र.	कादंबरीचे नाव	लेखकाचे नाव	प्रकाशन वर्ष
1)	ऐसे कुणबी भूपाळ	भारत काळे	2001
2)	धूळपेरणी	शेषेराव मोहिते	2001
3)	जोहार	सुशिल धसकटे	2015
4)	गावकळा	प्रदीप पाटील	2017
5)	भुई भुई ठाव दे	सीताराम सावंत	2017
6)	पिढीजात	श्रीकांत देशमुख	2019
7)	तसनस	आसाराम लोमटे	2020
8)	पाडा	अशोक कोळी	
9)	हुतराणी	नागनाथ पाटील	
10)	अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट	आनंद विंगकर	

संदर्भ टिपा:

१) डॉ.मुलमुले नंदकुमार

२) डॉ.मुळीक कीर्ती

संशोधक

श्री.भारत अच्युतराव गर्जे

चिद्दरवार

मार्गदर्शक

प्रा.डॉ.दीपक रामभाऊ

मराठी विभागप्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,

उदगीर जि.लातूर (महाराष्ट्र)